RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ६, अंक ८०] सोमवार, डिसेंबर २८, २०२०/पौष ७, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महिला व बाल विकास विभाग

३ रा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,

हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर, २०२०.

## अधिसूचना

**बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५.**

क्रमांक बा.न्या.म.-२०१९/प्र.क्र. १२७/का-०३.— बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २०१५ (२०१६चा २ ) मधील कलम ११० च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम २ च्या खंड (३) आणि (१४) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबतीत यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे नियम तयार करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण)(सुधारणा) नियम, २०२० असे म्हणावे.

२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ (ज्याचा उल्लेख यानंतर " मुख्य नियम " असा करण्यात आलेला आहे)मधील नियम ४च्या पोट नियम (३) ऐवजी खालील पोट नियम दाखल करण्यात येत आहे :—

" (३) समाजसेवक सदस्याचे वय ३५ वर्षांहून कमी नसेल आणि त्याला बालकांसंबंधीत शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील काम करण्याचा किमान सात वर्षांचा अनुभव असेल अथवा ते बाल मानसशास्त्र , मनोविकृतीचिकित्सा, समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायिक कार्य करीत असावेत. मंडळाच्या

कामकाजाशी हितसंबंध असणारी किंवा स्वत:ची बालकांची काळजी घेणारी संस्था इ. असणाऱ्या व्यक्तीची मंडळावर समाजसेवक सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.”

३. मुख्य नियमाच्या नियम १५ च्या पोट नियम (३) ऐवजी खालील पोट नियम दाखल करण्यात येत आहे :—

“ (३) समाजसेवक सदस्याचे वय ३५ वर्षांहून कमी नसेल आणि त्याला बालकांसंबंधीत शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील काम करण्याचा किमान सात वर्षांचा अनुभव असेल अथवा ते बाल मानसशास्त्र , मनोविकृतीचिकित्सा, विधी, समाजकार्य किंवा समाजशास्त्र किंवा मानव संसाधन यामधील पदवीसह व्यावसायिक कार्य करीत असावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आय. ए. कुंदन,**
शासनाचे सचिव.

**WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT**

3rd Floor, New Administrative Building, Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai-400 032, dated the 28th December, 2020.

*NOTIFICATION*

JUVENILE JUSTICE (CARE AND PROTECTION OF CHILDREN ) ACT, 2015.

No. JJB-2019/CR 127 /D-3.– In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (iii) and (xiv) of sub-section (*2*) of section 110 of the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 (2 of 2016), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra State Juvenile Justice ( Care and Protection of Children) Rules, 2018, as follows, namely :–

1. These rules may be called the Maharashtra State Juvenile Justice (Care and Protection of Children) (Amendment) Rules, 2020.

2. In the Maharashtra State Juvenile Justice (Care and Protection of Children) Rules, 2018 (hereinafter referred to as “the principal Rules”), in rule 4, for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :–

> “ (3) The social worker members shall not be less than thirty five years of age, and shall have at least seven years of experience of working with children in the field of education, health or welfare activities or should be a practicing professional with a degree in child psychology, psychiatry, sociology or law. No person in conflict of interest with that of the Boards work shall be appointed as a social worker member of the Board such as any person having own child care Institution, etc.”.

3. In rule 15 of the Principal Rules, for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :–

> “ (3) The member shall not be less than thirty five years of age, and shall have at least seven years of experience of working with children in the field of education, health or welfare activities or should be a practicing professional with a degree in child psychology, psychiatry, law, social work or sociology or human development”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. A. KUNDAN,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.